MHST090008782019

## नि.दि.दा.क्र.१४५/२०१९ मधील निशाणी क्र.५५ वरील आदेश

वादीने प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांचे वारस दाव्यात समाविष्ट करण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

३. वादीने प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने वाटपाकरीता दाखल केला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. २ नामदेव अनंता मुसळे (सुतार) यांचे तारीख ३१/१०/२०२३ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या मृत्युचा उतारा वादीस तारीख ०१/१२/२०२३ रोजी मिळाला आहे. त्यांच्या वारसांची नोंद दाव्यात प्रतिवादी क्र.२ मयत तर्फे वारस अशी करुन त्यांना सामील करण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. प्रतिवादींनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास त्यांची हरकत नसल्याचे कथन केले आहे. वादीचे म्हणण्याचे अवलोकन करता प्रतिवादी क्र.२ मयत असल्याचे दिसते. त्यामुळे या ठिकाणी प्रतिवादी क्र.२ चे नावास कंस करुन त्यांचे वारस दाव्यात समाविष्ट करण्यास परवानगी देणे योग्य व न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर हाण्यास पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) पुढील तारखेपर्यंत वादीनी दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत द्यावी.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR

Digitally signed by PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR
Date: 2025.09.19 11:53:09 +0530

स्थळ : कोरेगाव ( पी.डी.यवतकर )

दिनांक १८/०९/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.